महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/किमान वेतन/२५३३२ दिनांक : १४/०८/२०२४

# परिपत्रक

**विषय :** कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या विशेष भत्त्याच्या सुधारित दराबाबत.

**संदर्भ :** १. प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६, दि. ०२/०५/२०१६.
२. परिपत्रक क्र. औसंवि/अ/किमान वेतन/४७२४, दि. १२/०२/२०२४.

***************

प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६, दि. ०२/०५/२०१६ अन्वये, कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता असावी व कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन तसेच इतर संविधानिक देणी मिळावी यासाठी सविस्तर सुचना / निर्देश यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच वरील संदर्भ क्र. ०२ नुसार कंत्राटी कामगारांना दि. ०१/०१/२०२४ ते ३०/०६/२०२४ या कालावधीकरिता किमान वेतनासोबत द्यावयाच्या सुधारीत विशेष भत्त्याचे दर कळविण्यात आले होते.

आता, कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम-१९४८ मुंबई यांनी प्रसारीत केलेल्या अधिसुचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०२४(२)/कार्या-१०/ दि. ०६/०८/२०२४ अन्वये किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरीता प्रति महिना **परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे सुधारित दर दि. ०१/०७/२०२४ ते ३१/१२/२०२४ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.**

| अ.क्र. | अनुसुचित उद्योगाचे नांव | परिमंडळ -१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | ३,२५०.०० | ३,२५०.०० | ३,२५०.०० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील रोजंदारी कामगारांकरिता जाहीर केलेले सुधारीत विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना व मृत कर्मचाऱ्यांचे अवलंबित बाह्यस्त्रोतावर काम करीत असतील तर अशा बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील. **सदर विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०७/२०२४ ते ३१/१२/२०२४ या कालावधीकरिता लागू आहेत.**

सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी **कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती केलेल्या कंत्राटी कामगारांना दि. ०१/०७/२०२४ पासून लागू केलेल्या सुधारित विशेष भत्त्याच्या फरकाची रक्कम माहे सप्टेंबर - २०२४ च्या वेतनामध्ये ठेकेदाराकडून अदा केल्याबाबत खात्री करावी व त्यानुसार देयके अदा करण्यात यावी.**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee_Portal_Circular_I.R.Dept. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत :-
१. प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.
२. उप महाव्यवस्थापक (मा.व तं.- संपर्क पोर्टल), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
- **कृपया संपर्क पोर्टलमध्ये उपरोक्तपणे विशेष भत्त्याची रक्कम सुधारित करण्यात यावी.**

D:\SSPisey 3\MINIMUM WAGES/Kiman Vetan.docx